दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३३१ वा | मंगळवार दि. २६ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६


## शरद पवार यांना सोडण्यासाठी मला ऑफर्स : खडसे



**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा मोठा दावा केला आहे. भाजपकडून आपल्याला मोठी ऑफर असल्याचे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर शरद पवार यांना सोडण्यासाठी अजित पवार गटाच्या दोन मोठ्या नेत्यांनी आपल्याला फोन केले असल्याचा खळबळजनक दावा एकनाथ खडसे यांनी केला आहे. या आधी देखील एकनाथ खडसे यांनी अनेक मोठे गौप्यस्फोट करत सर्वांना धक्का दिला होता.

# आमदार अपात्रता प्रकरणाची दुसरी सुनावणी संपली

# पुढील सुनावणी १३ ऑक्टोबरला होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

आमदार अपात्रतेप्रकरणी १४ सप्टेंबरला झालेल्या पहिल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार २५ सप्टेंबर विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पार पडली. या सुनावणीमध्ये वेळापत्रक निश्चित होणार असले, तरी ही प्रक्रिया यावर्षी पूर्ण होण्याची शक्यता धुसर आहे. त्यामुळे आमदार अपात्रता प्रकरणी यावर्षी निकाल लागणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. कालच्या सुनावणीनंतर आता पुढील सुनावणी १३ ऑक्टोबर रोजी होणार आहे. दरम्यान, या संभाव्य वेळापत्रक पत्रकात कागदपत्र तपासणी, त्याचबरोबर साक्ष नोंदवणे, उलट तपासणी मुद्द्यांचा समावेश असल्याने या प्रक्रियेत तीन महिन्यांचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. डिसेंबरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन असल्याने त्या दरम्यानच्या कालावधीत सुनावणी होण्याची शक्यता धुसर असल्याने आता जानेवारी २०२४ मध्ये निर्णय येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने आमदार अपात्रतेवरील सुनावणीस उशीर होत असल्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर एका याचिकेद्वारे उपस्थित करून विधानसभा अध्यक्षांना तातडीने सुनावणी घ्यायला सांगावे, अशी विनंती केली होती. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाने आमदार अपात्रतेच्या कारवाईच्या दिरंगाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निदशावरून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १४ सप्टेंबरला पहिली सुनावणी घेतली होती. आता आज दुसरी सुनावणी संपन्न झाली आहे.

या सुनावणीवेळी दोन्ही गटाकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवादाला सुरुवात केली. या प्रकरणी एकूण ३४ याचिका आहेत. या याचिकांचं वेळापत्रक आजच्या सुनावणीनंतर जाहीर होण्याची शक्यता आहे. पुढील सुनावणी कशी घेणार आहात? वेळापत्रक कसं असेल? किती वेळ लागेल? असे प्रश्न ठाकरे गटाच्या वकिलांनी विधानसभा अध्यक्षांना विचारले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्व याचिकांवरील सुनावणी एकत्रित घ्यावी, अशी मागणी ठाकरे गटाने केली. आम्ही वारंवार तुमच्याकडे मागणी करतोय. महत्त्वाचा मुद्दा हा अपात्रतेचा आहे. त्यासाठी इतर याचिका विचारात घेण्याची गरज नाही. महत्त्वाची याचिका निकाली काढा, अशी भूमिका ठाकरे गटाच्या वकिलांनी विधानसभा अध्यक्षांसमोर मांडली. त्यावर शिंदे गटाच्या वकिलांनी आक्षेप घेतला. सर्व याचिका एकत्र करा. आमची मागणीवर विचार का केला जात नाही?, असं ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत म्हणाले. त्यावर शिंदे गटाच्या वकिलांनी आक्षेप घेतला. सगळ्या याचिकांची सुनावणी एकत्रित नको, असा आक्षेप शिंदे गटाचे वकील अनील साखरे यांनी नोंदवला आहे. पण सर्व ३४ याचिकांवर एकत्रित सुनावणी घेतली तर या प्रकरणावर लवकर निकाल घेता येईल. सर्व याचिकांचा मुद्दा हा अपात्रतेचाच आहे. त्यामुळे सर्व ३४ याचिकांवर एकत्रित सुनावणी घ्या, असा युक्तिवाद ठाकरे गटाच्या वकिलांनी केलाय. पण याच युक्तिवावर शिंदे गटाच्या वकिलांनी आक्षेप घेतलाय.



### नोटीसा देण्यापलीकडे काहीच केले नाही

**शिवसेनेत बंड करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांना अपात्र ठरवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने ११ मे रोजी निकाल दिला होता. यावेळी आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी ठराविक मुदतीत घ्यावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मात्र, त्यानंतर सुमारे ४ महिने वेळकाढूपणा करणारे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी सोमवारी खडे बोल सुनावले होते. नोटिसा देण्यापलीकडे अध्यक्षांनी काहीही केलेले दिसत नाही. आता पुढे काय कारवाई करणार याबाबतचे वेळापत्रक ८ दिवसांत सादर करावे, असे आदेशही सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी दिले होते. तर, आपण दिरंगाई केली नाही. नियमानुसारच सुनावणी सुरू आहे, अशी भूमिका नार्वेकरांनी मांडली होती.**

### म्हणून विधानसभा अध्यक्ष नाराज : संजय शिरसाट

**ही सुनावणी पूर्ण झाल्यानंतर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, आजच्या सुनावणीमध्ये प्रत्येक पक्षाच्या वकिलांनी युक्तिवाद केला. त्यामध्ये प्रत्येक पक्षाकडून आपली बाजू मांडण्यात आली. तर ही सुनावणी कधी होणार याचं वेळापत्रक जाहीर होणार आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी निकाल राखून ठेवलाय. तसेच ही सुनावणी ऑनलाइन व्हावी असे अनेकांचं म्हणणं आहे. याबाबत अध्यक्षांनी देखील नाराजी व्यक्त केली आहे. तर प्रत्येक वकिलांना स्वतंत्र पुरावे द्यायचे आहेत.**

### वेळ न दवडता निर्णय घ्यावा : देसाई

**एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी २९ व ३० जून रोजी राज्यपालांची भेट घेतली. त्यानतंर ३० जून रोजी त्याचा शपथविधी झाला. या सर्व गोष्टींना कोणत्याही पुराव्यांची गरज नाही. कारण हे सर्वकाही प्रत्यक्षात घडले आहे. त्यामुळे अपात्रतेची कारवाई २/१ ए व बी नुसार हे स्पष्ट उल्लंघन आहे. हे सर्व मुद्दे आम्ही अध्यक्षांना दिलेत. त्यामुळे त्यांनी वेळ न दवडता या प्रकरणी निर्णय घ्यावा, अशी आमची विनंती आहे, असे देसाई म्हणाले.**

### न्यूज कॉलम

#### पावसामुळे बोरी नदीला आला पूर

**विंचूर ।** विंचूरसह बोरी नदीच्या पट्ट्यात रविवारी पहाटे झालेल्या जोरदार पावसामुळे बोरी नदीला पूर आला आहे. नदी दुथडी भरून वाहत आहे. गेल्या वर्षी पहिल्याच पावसात नदीला पूर आला होता. यंदा मात्र शेवटी शेवटी परतीच्या पावसातच नदीला पाण्याची जोरधार बघावयास मिळत आहे. त्यामुळे यंदा बोरी पट्ट्यातील सर्व गावांना पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

#### दांपत्याने केली घरातच आत्महत्या

**धुळे ।** सातरणे (ता. धुळे) येथे तरुण दांपत्याने गळफास घेत आत्महत्या केली. सागर दिलीप कोळी (वय २२) व पायल सागर कोळी (वय २०) असे आत्महत्या केलेल्या दांपत्याचे नाव आहे. घरात कोणी नसताना दरवाजे आतून बंद करून दांपत्याने दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. हा प्रकार लक्षात आल्यावर त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याबाबत धुळे तालुका पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. पती-पत्नीच्या आत्महत्येमागील कारण समजले नाही.

## ट्रॅव्हल्समधून गुटख्याची तस्करी ; दीड लाखांचा मुद्देमाल जप्त, तरूण अटकेत

**धुळे । प्रतिनिधी**

येथील तालुका पोलिसांनी ट्रॅव्हल्समधून होणारी गुटख्याची तस्करी रोखली. पुण्यातील प्रवाशाकडून दीड लाखांचा सुगंधीत पानमसाला जप्त करण्यात आला. इंदूर येथून खरेदीकरून तो हा माल पुणे येथे विक्रीसाठी नेत होता. याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई-आग्रा महामार्गावरुन इंदूर येथून राजरत्न ट्रॅव्हल्सकंपनीच्या एमपी ३० पी ७७७० क्रमांकाच्या लक्झरी बसमधून पुण्याकडे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेल्या सुगंधीत पानमसाल्याची बेकायेशीरपणे वाहतुक होत असल्याची गुप्त माहिती काल धुळे तालुका पोलिस ठाण्याचे पीआय प्रमोद पाटील यांना मिळाली. त्यामुळे त्यांनी पथकासह आर्वी दुरक्षेत्र समोरनाकाबंदी करुन सापळा लावला. पहाटे सव्वा तीन वाजता धुळ्याकडून मालेगावकडे जाणार्या संशयीत लक्झरीची तपासणी केली असता अभिषेक सुर्यप्रकाश शुक्ला (वय २३ रा. प्लॉट-७, गुलमोहर कॉलनी, डायमन्ड वॉटर पार्क जवळ, लोहगाव, पुणे) या प्रवाशाने इंदूर येथून सुगंधीत पानमसाल्याची खरेदी करुन पुणे येथे विक्री करण्यासाठी वाहनात घेवून जात असल्याचे निष्पन्न झाले. वाहनातून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकुण १ लाख ५२ हजार २२४ रुपये किंमतीचा केसरयुक्त विमल पानमसाला व सुगंधीत तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. याप्रकरणी अभिषेक शुक्ला याच्याविरोधात धुळे तालुका ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पीएसआय दीपक धनवटे हे करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या शोध पथकातील पोउनि दीपक धनवटे, अंमलदार असई पंजाबराव साळूंखे, पोहवा रविंद्र राजपूत, प्रविण पाटील, नितीन चव्हाण, पोहेकाँ किशोर खैरनार, पोना मुकेश पवार, पोकाॅ प्रमोद पाटील, वसंत वाघ यांच्या पथकाने केली.

## नाशकात पावसाची तुफान हजेरी; नागरिकांची उडाली तारांबळ



**नाशिक । प्रतिनिधी**

दोन आठवड्यापूर्वी नाशिक शहरासह जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला होता. तसेच या पावसामुळे शेतकऱ्यांना देखील काही प्रमाणात धीर मिळाला होता. यानंतर ग्रामीण भागात पावसाची रिपरिप सुरु होती. मात्र, शहरात पाऊस उघडझाप पद्धतीने हजेरी लावत होता. त्यामुळे नागरिकांना काहीसा उन्हाचा चटका जाणवत होता.

काल सकाळपासून शहरातील काही भागांत ढगाळ वातावरण असल्याचे चित्र होते. तर काही भागांत उन्हाचे चटके जाणवत होते. यानंतर दुपारी एक वाजता ढग दाटून आले होते. त्यानंतर दुपारी दोन वाजेच्या सुमारास शहरातील एमजी रोड, शालीमार, सीबीएस यासह आदी परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, हवामान विभागाकडून आज नाशिक जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. त्यानुसार आज सकाळपासून शहरात ढगाळ वातावरण होते. त्यानंतर दुपारी दोन वाजेच्या सुमारास पावसाने शहरातील काही भागांत तुफान हजेरी लावली. दुसरीकडे जिल्ह्यातील सटाणा बागलाण, येवला, नांदगाव, चांदवड, दिंडोरी, सिन्नर, देवळा, पेठ, त्र्यंबकेश्वर, निफाड या तालुक्यांत मुसळधार पाऊस झाला आहे. तर काही भागात पाऊस सुरु असल्याने धरणांच्या पाणीपातळीत वाढ झाली असून अनेक धरणांतून विसर्ग सुरु करण्यात आलेला आहे.

## फागणे येथील शिक्षकाची नियुक्ती केली रद्द

### ॲड.महेंद्र भावसार यांचा युक्तीवाद

**धुळे । प्रतिनिधी**

फागणे (ता.धुळे) येथील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक सोपान पाटील यांची नियुक्ती रद्द करण्याचे आदेश धुळे येथील दिवाणी न्यायाधीश निखिल गुप्ता यांनी दिले. रूरल एज्युकेशन सोसायटी या संस्थेतर्फे चालविण्यात येणारे सरस्वती कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय फागणे येथील शिक्षक सोपान आधार पाटील यास संस्थेने २८ जुलै २०१५ ला नियुक्ती दिली होती.

या शिक्षकाला शिक्षण उपसंचालक यांनी मान्यता दिली होती. शिक्षक शासन अनुदानातून वेतन घेत होता. परंतु नियुक्तीच्या वेळी मुलाखतीला उपस्थित असलेली एक उमेदवार अनिता कौतिक देसले यांनी देखील त्यावेळी मुलाखत दिंली होती. त्यांना सर्वाधिक गुण होते. संस्थेने अनिता देसले यांना डावलून सोपान पाटील यांची नियुक्ती केली. अनिता देसले यांच्यावर अन्याय झाल्याने त्यांनी सन २०१६ मध्ये धुळे येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. दाव्याची सुनावणी झाली अनिता देसले यांच्यासह सोपान पाटील, प्राचार्य या सर्वांच्या न्यायालयात साक्ष झाली. सोपान पाटील याची नियुक्ती करतांना संस्थेने शिक्षण उपसंचालक यांच्याकडून अतिरिक्त शिक्षकांची मागणी केली नाही तसेच अनिता देसले यांना सर्वाधिक गुण असतांना ती भरती प्रक्रिया अचानक रद्द करून नव्याने भर्ती प्रक्रिया केली, सोपान पाटील यांच्याकडे त्या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता नसतांना त्यांना नियुक्ती दिली. हा सर्व युक्तीवाद अनिता देसले यांच्यावतीने ॲड. महेंद्र भावसार यांनी केला. उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवाद यांच्या आधारे सोपान पाटील यांची सन २०१५ सालची नियुक्ती रद्द केली. अनिता देसले यांच्यातर्फे ॲड. महेंद्र भावसार यांनी काम पाहिले.

## शहरातील २५ ते ३० अनधिकृत बॅनर काढले

**धुळे । प्रतिनिधी**

शहरात बॅनर लावताना महापालिकेची रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. असे असताना शहरातील चौका-चौकात विनापरवानगी मोठ-मोठे बॅनर लावून शहराचे विद्रुपीकरण क रण्यात आलेले आहे. त्यामुळे अशा फुकट्या बॅनरबाज भाऊ, दादा, बाबाला मनपाने हिसका दाखविण्यास सुरुवात झाली आहे.

दिवसभरात शहरातील विविध ठिकाणचे तब्बल २५ ते २५ बॅनर हटविण्याची कारवाई करण्यात आली. मनपाच्या या धडक कारवाईनंतर काहींनी महापालिकेत पावती फाडण्यासाठी धाव घेतल्याचे चित्र आहे. सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. गणेशोत्सवानिमित्त शहरातील मुख्य चौकांमध्ये काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ-मोठे बॅनर लावले आहेत. यामुळे काही ठिकाणी वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून शहराच्या विद्रुपीकरणात भर पडली आहे. विशेष म्हणजे बहुतेकांनी महापालिकेची परवानगीच घेतली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा फुकट्या चमकोगिरी करणार्यांविरोधात मनपाने कारवाईचे हत्यार उपसले आहे. याबाबत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांनी याबाबत एक परिपत्रकच जारी केले आहे.



अनधिकृत बॅनरविरोधात न्यायालयाच्या निर्देशानुसार वेळोवेळी सक्त कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. त्यानुसार महापालिकेच्या पुर्व परवानगीशिवाय अनधिकृतपणे जाहिरात फलक लावणार्या व्यक्तिंवर, छपाई केंद्रांवर महाराष्ट्र मालमत्ता विरुपणास अधिनियम १९९५ चे कलम ३ व महापालिका अधिनियम १९४५ चे कलम २४४ व २४५ अन्वये कारवाई केली जात आहे. बॅनर लावताना मनपाची परवानगी घेणे व बॅनरवर परवाना क्रमांक छापणे बंधनकारक आहे. ज्या बॅनरवर परवाना क्रमांक नाही, अशा बेकायदेशीर बॅनरविरोधात कारवाई करण्यासाठी मनापचे वाहन शहरात फिरत आहे. त्यानुसार दिवसभरात जयहिंद चौक, जयहिंद सिनीयर चौक, कराचीवाला खुंट, शिवतिर्थ, जिल्हा क्रीडा संकुल, दत्तमंदिर चौक, अग्रसेन चौक, दसेरा मैदान, लेनीन चौक, चाळीसगांव चौफुली आदी भागातील २५ ते ३० बेकायदेशीर बॅनर हटविण्यात आले. त्यामुळे बॅनरवर झळकणारे स्वयंघोषित युवा नेते, भाऊ, दादा, बाबाला चांगलाप चाप बसला. शिवाय या कारवाईत वाहतुकीला अडथळा ठरणारे १२०-१२५ झेंडेही उतरविण्यात आले. दरम्यान, मनपाच्या या धडक कारवाईनंतर काहींनी परवानगी घेण्यासाठी महापालिकेत धाव घेतल्याचे चित्र आहे.

## जिवंत देखावे बनले गणेशोत्सवाचा नवा ट्रेंड

**यंदा गणेश मंडळांनी जिवंत देखाव्यावर भर दिला आहे. त्यामुळे स्टेज कलाकारांना यंदा अच्छे दिन आल्याचे दिसत आहे. गणेशोत्सव जवळ आल्यामुळे घरगुती गणेशोत्सव, गणेशमंडळे या सर्वांची तयारी जोरात आहे. यंदा कलाकारांना आणि हौशी कलाकारांना कला सादर करण्याची संधी मिळत आहे.**

गणेशोत्सव मंडळाच्या ठिकाणी गर्दी जमते अन सुरू होतो नाट्याविष्कार... कलाकार जिवंत देखाव्यातून आपले अभिनय कौशल्य सादर करतात अन्‍या थेट सादरीकरणाला गणेशभक्तांची दिलखुलास दाद मिळते... दरवर्षीप्रमाणे यंदाही हौशी आणि अनुभवी कलाकारांनी सादर केलेल्या जिवंत देखाव्यांचे प्रमाण वाढले आहे. शहरातील अनेक मंडळांनी यवर्षीही जिवंत देखाव्यांच्या सादरीकरणावर भर दिला आहे. त्यातून अनेक पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक आणि मनोरंजनात्मक विषय हाताळले जात आहेत. या जिवंत देखाव्यांच्या सादरीकरणातून कलाकारांचेही अर्थार्जन होत आहे. वैविध्यपूर्ण मांडणी आणि विषय असणारे हे जिवंत देखावे पुण्यातील गणेशोत्सवाचा नवा ट्रेंड बनत आहेत. सायंकाळचे सहा वाजले की, हा अनोखा नाट्याविष्कार सुरू होतो. या देखाव्यांमध्ये ऐतिहासिक आणि सामाजिक भान जागविणाऱ्या विषयांवर भर देण्यात येत आहे. कुठे भ्रष्टाचारावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे, तर कुठे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची गाथा उलगडणारा देखावा साकारला आहे. तर कुठे बाललैंगिक शोषणाचा गंभीर विषय बोलका होत आहे. हा नाट्याविष्कार सादर करताना एक वेगळाच अनुभव, रसिकांची उत्स्फूर्त दाद आणि आनंद मिळत असल्याची भावना कलाकार व्यक्त करतात. गणेश मंडळे अनेक वर्षांपासून या देखाव्यांसाठी प्रसिद्ध आहेत. ऐतिहासिक घटनांची रंजक मांडणी किंवा सामाजिक विषयावर प्रबोधनाचा संदेश देणारा देखावा, हे या देखाव्यांचे वैशिष्ट्य आहे. यंदाही ही परंपरा कायम असून, मंडळांसमोर देखावा कलाकार सादर करत आहेत.

### देखाव्यातून आर्थिक उलाढाल

**मंडळांच्या बजेटवर कलाकारांचे मानधन ठरलेले आहे. तसेच स्किटमध्ये साकारत असलेल्या पात्रानुसार मानधन ठरते. मुख्य भूमिकेसाठी जास्त मानधन दिले जाते. वेशभूषा, मेकअप, नेपथ्य यांवर देखील खर्च केला जात आहे. त्यामुळे जिवंत देखावा सादर करणारी मंडळे लाखोचा खर्च करत आहेत.**



### कलाकारांना संधी

**हौशी कलाकारांना नाटकात काम करायचे झाल्यास नाट्यसंस्थाकडे ऑडिशन द्यावी लागते. त्यात यशस्वी झाली तर काम मिळते. मात्र, जिवंत देखाव्यात तशी काही अट नसते. याठिकाणी व्यक्ती हौशी कलाकार (नॉन आर्टिस्ट) असली तरी हरकत नसते. अशा कलाकाराला दिग्दर्शक संधी देवून त्याच्याकडून काम करवून घेतो.**




## वनहक्क दाव्यांची शिरपूरला सुनावणी ४०७ प्रकरणांवर झाले कामकाज

**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर येथे विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडून अपिलाबाबत सामूहिक वनहक्क दाव्यांची सुनावणी झाली. यात आमंत्रित ६०० पैकी एकूण ४०७ प्रकरणावर कामकाज झाले.

तालुक्यातील आदिवासी व इतर वन निवासी लोकांनी दाखल केलेल्या १७ हजार दावेबाबत अनुसूचित जाती व इतर पारंपरिक वन निवासी वनहक्क अधिकाराची मान्यता अधिनियम- २००६ अंतर्गत १५ वर्षांपूर्वी दाखल केलेल्या वनदाव्यांच्या संबंधात माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा यांच्या अथक प्रयत्नातून ११ हजार दाव्यांना गेल्या वर्षी मंजुरी मिळून त्याचे सातबारा अधिकृत वन कागदपत्रेदेखील मिळाले. ही या तालुक्यातील एक ऐतिहासिक व आदिवासी बांधवांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना ठरली आहे. अतिरिक्त आयुक्त नीलेश सागर, आदिवासी आयुक्त गोलाईत यांचे समोर अपील अर्ज बाबत सुनावणीबाबत ॲड. बाबा पाटील यांनी कायदेशीर बाबींवर आदिवासी बांधवांतर्फे युक्तिवाद केला. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रभाकर चव्हाण, शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के. डी. पाटील, एस. के. गवळी हे देखील उपस्थित होते.

## गुणवत्ता आणि बाजारीकरण

वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (पीजी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेत शून्य पर्सेंटाइल मिळाले, तरी प्रवेश देण्याचा राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेचा (एनएमसी) निर्णय हा शिक्षणाच्या बेसुमार बाजारीकरणाचा परिपाक आहे. लाखो रुपये शुल्क आकारणाऱ्या खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर वर्गाच्या जागा रिकाम्या राहू नयेत, या कारणासाठी पात्रतेची अट शिथील करण्यात आल्याचे कारणही त्यामागे आहे.

वैद्यकीय शिक्षणामागील अर्थकारणाचा, शिक्षणसम्राटांनी केलेल्या गुंतवणुकीच्या परताव्याचा मुद्दा यामागे आहे. प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात जागा उपलब्ध करण्यासाठी खासगीकरणावर भर देऊन 'मागणी तसा पुरवठा' हे तत्त्व शिक्षण क्षेत्राला लागू केल्यानंतर बाजारपेठेचे नियम लागू होणारच होते. खासगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली त्याला आता चार दशकांहून अधिक काळ लोटला. या काळात खासगी महाविद्यालयांची आणि त्यांमधील जागांची संख्या इतकी वाढली, की आता जागा जास्त आणि इच्छुक विद्यार्थी कमी असे उलटे समीकरण तयार झाले. वैद्यकीय पदव्युत्तरच्या सुमारे दोन हजार जागा दरवर्षी रिकाम्या राहतात, असा अनुभव आहे. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीयच्या पदव्युत्तर वर्गाच्या तीन हजार ७४४ जागा रिक्त होत्या. खासगी महाविद्यालयांमधील पदव्युत्तर वर्गांचे शुल्क साधारण दहा ते पन्नास लाख रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे या जागा रिकाम्या राहणे म्हणजे इतक्या मोठ्या रकमेवर पाणी सोडणे. यंदाच्या प्रवेश पात्रतेचे नियम शिथील करण्यामागे हे अर्थशास्त्र दिसते.

वास्तविक, वैद्यकीय पदवीच्या तुलनेत पदव्युत्तरच्या जागा कितीतरी कमी आहेत. देशभरात वैद्यकीय पदवीच्या सुमारे एक लाख; तर पदव्युत्तर वर्गाच्या जागा ६५ हजारांच्या घरात आहेत. त्यामुळे पदव्युत्तर प्रवेशासाठी अजूनही चुरस आहे. राष्ट्रीय पात्रता परीक्षेद्वारे (नीट पीजी) या वर्गांना प्रवेश दिला जातो. किमान पन्नास टक्के पर्सेंटाइल मिळविलेले, म्हणजे परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी निम्म्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक गुण असलेले विद्यार्थी पात्र ठरतात. आता पर्सेंटाइलची अटच काढून टाकल्याने प्रवेश परीक्षेला बसलेले सर्वच विद्यार्थी पात्र ठरतील. 'या निर्णयामुळे गुणवत्तेचे काय होईल, पात्रता परीक्षेत चांगले गुण मिळवू न शकलेले प्रत्यक्ष अभ्यासक्रमात कशी चांगली कामगिरी करतील, ते पुढे चांगले डॉक्टर कसे होतील,' असे प्रश्न काही पालकांकडून उपस्थित होत आहेत. हे प्रश्न चुकीचे नाहीत; परंतु त्यांना आता फारसा अर्थ राहिलेला नाही. वैद्यकीय शिक्षणाचे खासगीकरण झाले तेव्हाही हे प्रश्न विचारले गेले होते. प्रवेश मिळविण्याइतपत गुण असूनही केवळ पैसे नसल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाला मुकलेले अनेक विद्यार्थी पूर्वीही होते आणि आताही आहेत. कमी गुण मिळवूनही पैशाच्या जोरावर डॉक्टर झालेल्यांची समाजाला आता सवय झाली आहे. त्यांपैकी काहींनी, आपल्या शिक्षणासाठी केलेल्या गुंतवणुकीची दामदुप्पट वसुली करण्यासाठी महागडी रुग्णालये सुरू केली असून, तिथे रुग्णांची रांग आहे. गुणवत्तेच्या मुद्द्यातील फोलपणा यातून अधोरेखित होतो. वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र असलेले; परंतु पैसे नसलेल्या घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी सरकारने अधिक महाविद्यालये काढणे आवश्यक आहे. गेल्या आठ वर्षांत पदव्युत्तरच्या जागा ३१ हजारवरून ६५ हजारांवर गेल्या हे खरे; त्यामध्ये सरकारी महाविद्यालयांमधील जागा अधिक आहेत हेही खरे; परंतु ही संख्या आणखी वाढायला हवी. डॉक्टरांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात राहण्यासाठी सरकारला यासाठी गुंतवणूक करावी लागेल.

वैद्यकीय शाखेप्रमाणेच अभियांत्रिकीच्या प्रवेशाच्या बातम्याही सध्या चर्चेत आहेत. यांत्रिकी, स्थापत्य आदी अभियांत्रिकी पारंपरिक शाखांना विद्यार्थी मिळत नसल्याची, काही महाविद्यालयांत या शाखांत एकाही विद्यार्थ्याने प्रवेश न घेतल्याची बातमी आहे. ही बाबही आश्चर्यकारक नाही. अभियांत्रिकीच्या जागा रिकाम्या राहण्यास सुरुवात होऊनही आता दहा-बारा वर्षे झाली. देशात अभियांत्रिकीच्या सुमारे चौदा लाख जागा असून, त्यांपैकी चार ते पाच लाख जागा दरवर्षी रिक्त राहतात. एकट्या महाराष्ट्रात सव्वा दोन लाखांहून अधिक जागा आहेत; त्यांपैकी एक लाख जागा गेल्या वर्षी रिकाम्या होत्या. संगणक तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार तंत्रज्ञान या क्षेत्रांत नवनवीन संशोधन विकसित होत असल्याने या शाखांना अधिक मागणी आहे. स्थापत्य किंवा यांत्रिकी या शाखा अर्थातच महत्त्वाच्या आहेत. प्रमुख महाविद्यालयांमध्ये त्या जागांनाही मागणी असतेच; परंतु इतरत्र विद्यार्थी त्याकडे पाठ फिरवतात. शिक्षण आणि उद्योग यांची योग्य सांगड घातली गेली तर कदाचित ही स्थिती बदलण्यास मदत होईल. अन्यथा दरवर्षी हे असेच चालू राहील.

## जागतिक कर्णबधिर दिन

कर्णबधिर लोकांच्या दैनदिन जीवनातील समस्यांविषयी सर्वसाधारण जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक कर्णबधिर दिन साजरा करण्यास सुरुवात झाली.

जगात कर्णबधिरांच्या प्रश्नांवर ख-या अर्थाने काम करण्यास सुरुवात झाली ती २९ सप्टेंबर १९५१ रोजी. याच दिवशी इटलीच्या रोममध्ये जागतिक कर्णबधिर महासंघाची 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ दी डेफ'ची स्थापना झाली. या निमित्ताने गेल्या सहा दशकांत प्रतिवर्षी सप्टेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा हा कर्णबधिर सप्ताह तर शेवटचा रविवार हा आंतरराष्ट्रीय कर्णबधिर दिवस म्हणून साजरा केला जातो...

जगातील कर्णबधिरांसाठी वापरण्यात येत असलेल्या भाषेत अनेक प्रकारच्या सुधारणा करण्याची, त्यांना अधिकाधिक उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, माहिती आणि सेवा पुरवणे, त्यांना देण्यात येणा-या अधिकारांमध्ये अधिक सुधारणा करणे, त्यासाठी संस्थांची । स्थापना करणे आदी कार्य अव्याहतपणे सुरू आहेत. त्यासोबतच जगभरातील कर्णबधिरांसाठी मानवी अधिकार आणि समता मिळवून देणे, त्यांची कर्तबगारी, त्यांचे सांस्कृतिक योगदान जगाच्या समोर आणणे आणि या लोकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे यासाठी जागतिक कर्णबधिर महासंघाचे कार्य चालते.

संयुक्त राष्ट्रसंघाशी संबंधित असलेल्या जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, जागतिक बँक, युरोप आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटना, जागतिक आर्थिक व सामाजिक परिषद आदींचे सहकार्य महासंघाच्या कामाला मिळत आहे. अपंगांना संधी देणे, त्यांना । बरोबरीचा दर्जा उपलब्ध करून देणे यासाठी प्रत्येक संघटनेकडून एक महत्त्वाचे योगदान मिळत असले तरी यातील शेकडो संस्थांचे जाळे नियंत्रित करण्याचे कामही जागतिक कर्णबधिर महासंघाकडून केले जाते.

या महासंघाच्या स्थापनेनंतर १९५१ मध्ये कर्णबधिरांसाठी पहिली जागतिक कॉंग्रेस परिषद इटलीमध्ये झाली होती. त्यानंतर महासंघाकडून युगोस्लाव्हिया, जर्मनी, स्वीडन येथे दर चार वर्षांनी कॉंग्रेस परिषदा झाल्या. मात्र या वेळी महासंघाकडे कोणत्याही प्रकारच्या संकल्पना नव्हत्या, मात्र १९६७मध्ये पोलंड येथे झालेल्या परिषदेपासून प्रत्येक परिषदेत एक विशेष संकल्पना घेऊन कार्यक्रम आखण्याची सुरुवात झाली. त्यानंतर प्रत्येक दर चार वर्षांनी पॅरिस, वॉशिंग्टन, बल्गेरिया, इटली, इथिओपिया, फिनलँड, टोकियो, व्हिएन्ना, ब्रिस्बेन, मॉंट्रियल, माद्रिद आणि २०११ मध्ये डर्बन या ठिकाणी या परिषदा झाल्या आहेत. ही जागतिक कॉंग्रेस परिषद २०१५ मध्ये तुर्कीच्या इस्तंबुल येथे झाली होती.

। १३३ देशांमध्ये या महासंघाचे जाळे पसरले असून त्यात आशिया खंडात भारतातील प्रमुख केंद्र मुंबईतील 'अलीयावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्था' हे आहे. महासंघाच्या स्थापनेची उद्दिष्टे कर्णबधिरांच्या एकूण विकासाशी संबंधित होती. यामुळे कोणत्याही प्रकारे । मानवी हक्कांचे जतन करत कर्णबधिरांसाठी सांकेतिक भाषेचा विकास करणे आणि त्या माध्यमातून जगातील या लोकांना एकत्र करण्याचे महत्त्वाचे कार्य केले जात आहे. जगभरात काम करणा-या विविध संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींच्या परिषदा आयोजित करून त्यातून अनेक नवीन मार्ग चोखाळले जात आहेत. महासंघाने आजवर विविध प्रकारच्या संकल्पना राबवल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताह, आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करून कर्णबधिरांसाठी अनेक प्रकारच्या विकासांचे मार्ग खुले करून देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर भारतात १९८३ मध्ये स्थापन झालेल्या मुंबईतील 'अलीयावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थे'ला ३३ वर्षे पूर्ण झाली ।आहेत. गेल्या तीस वर्षात संस्थेने आपल्या कामाची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. या क्षेत्रात काम करण्यासाठी लागणारे आवश्यक आणि प्रशिक्षित मनुष्यबळ विकसित करण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. देशाच्या कानाकोप-यात या संस्थेतून प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांनी आपल्या कामाचा एक ठसा उमटवला आहे. बहिरेपणा काय असतो, त्याची कारणे, उपाय, निदान, चिकित्सा, उपचारपद्धती, सेवा, सुविधा, त्याविषयी संशोधन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जनजागृतीचेही काम केले आहे.

या संस्थेचे जनमाध्यम व प्रसारण अधिकारी म्हणून काम पाहत असलेले डॉ. त्र्यंबक दुनबळे यांनी सांगितले, 'निलगिरी पर्वताच्या रांगा । असो किंवा आसाममधील आदिवासी पाडे अथवा जम्मू काश्मीरमधील बर्फाळ प्रदेश अशा अनेक ठिकाणी संस्थेचे प्रतिनिधी जाऊन याविषयी मोलाचे कार्य करत आहे.

जागतिक कर्णबधिर महासंघाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच हे काम चालत असलं तरी त्याही पलीकडे जाऊन संस्थेने आपल्या कामाची एक वेळी छाप निर्माण केली आहे. यामुळे गेल्या तीन दशकांत संस्थेला दोन आंतरराष्ट्रीय आणि तब्बल १२हून अधिक राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. संस्थेची कोलकाता, नवी दिल्ली, सिकंदराबाद, भुवनेश्वर येथे विभागीय तर भोपाळ आणि अहमदाबाद येथे संयुक्त विभागीय केंद्रे आहेत.

कर्णबधिरांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी विविध प्रकारचे संशोधन करणे आणि मोफत सोयी-सुविधा पुरविणे आणि प्रशिक्षित मनुष्यबळ विकसित करणे ही संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. आजघडीला याचसाठी संस्थेकडे सुमारे पाच लाख रुपये किमतीची पुस्तके, ग्रंथ, संदर्भग्रंथ, अहवाल उपलब्ध आहेत. वाक् व श्रवण भाषा आणि विशेष शिक्षण (कर्णबधिरता) क्षेत्रात केवळ पदवीच नाही, तर पदव्युत्तर आणि पीएच. डी. आणि बी. एड्, एम. एड्. पर्यंतचे शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेकडून उपलब्ध करून दिले जात आहे. यातील बहुतेक अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठ व त्याअंतर्गत असलेल्या संस्थांमध्ये सुरू आहेत. मात्र देशभरात पारंपरिक विद्यापीठे, राष्ट्रीय मुक्त । विद्यापीठे, खासगी शिक्षण संस्था, एनजीओ यांच्यामार्फत अनेक प्रकारचे अभ्यासक्रम आणि उपक्रम राबविले जात आहेत. कोणत्याही संस्थेतून पदवी, पदव्युत्तर, बी. एड्., एम.एड्. केलेल्या विद्यार्थ्यांना देशातील कोणत्याही राज्यात नोकरी अथवा अध्यापनाचे कार्य करता येते. ही या अभ्यासक्रमांची मोठी जमेची बाजू आहे.

श्रवण, वाक् व भाषा अभ्यासक्रम हे महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत तर विशेष शिक्षण हे मुंबईत मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत चालवण्यात येते. हे सर्व अभ्यासक्रम भारतीय पुनर्वसन परिषदेच्या मान्यतेनुसार चालतात. यासोबतच संस्थेकडून वैद्यकीय, निमवैद्यकीय शिक्षण, आरोग्य शिक्षण, माध्यम शिक्षण व सामाजिक, आर्थिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध समूहांसाठी ।अल्पावधीचे प्रशिक्षण कार्यक्रमही राबवले जातात. देशाच्या कानाकोप-यात संस्थेचे प्रतिनिधी जाऊन अभिमुखीकरण, कार्यशाळा, मेळावे, प्रदर्शने, चर्चासत्रांचे आयोजन करतात. याच माध्यमातून संस्थेच्या मुंबई व विभागीय केंद्रांवर श्रवण, वाक् व भाषा शिक्षणविषयक निदान, चिकित्सा व उपचार सेवा पुरविली जाते. वाक् व भाषा विशेषज्ञाबरोबरच बालरोग व मेंदूविकारतज्ज्ञ, विशेष ।। शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यरंच्या माध्यमातून आवश्यक सहकार्य करण्यात येते. तर संस्थेकडून राबवण्यात येणा-या योजनेतून श्रवणयंत्र व कर्ण संच मोफत पुरवला जातो.

संस्थेकडून अपंग पुनर्वसन सेवांमध्ये काळानुरूप सुधारणा केल्या जातात. यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि संगणक आधारित नवीन मोडयुल्सचा नियमित वापर करूनच पुढील संशोधनाला प्राधान्य देण्यात येते. ते नागरी आणि ग्रामीण भागातील समस्यांवर आधारित असते.त्या आधारावरच पुनर्वसन आदी उपक्रम राबवणे सोयीस्कर होते. या क्षेत्रात रुची असलेल्या युवकांना रोजगार मिळावा यासाठी । विशेष रोजगार सेवा केंद्रांच्या माध्यमातून सेवा पुरवल्या जातात. राज्य अपंग आर्थिक महामंडळ आणि इतर आर्थिक संस्थांकडूनही स्वयंरोजगारासाठी मदत मिळते.

संस्थेकडून राबवण्यात येत असलेल्या अनेक उपक्रमांपैकी माहिती व प्रलेखन, विकास साधने हा भागही महत्त्वाचा आहे. संस्थेकडे असलेल्या सुसज्ज ग्रंथालयात अपंगत्व आदी विषयांवर जगातील सर्व प्रकारची पुस्तके, संदर्भग्रंथ, सीडी ऑनलाइन आणि अपंगांसाठी खास असलेल्या 'डिसॲबिलिटी इन्फॉर्मेशन लाइन'च्या माध्यमातून सर्वसामान्यांनाही उपलब्ध करून दिल्या जातात. तसंच 'आयव्हीआरएस' या संगणक प्रणालीवर आधारित देशातील विविध राज्यांतील लोकांना अपंग पुनर्वसनविषयक सेवा कशा उपलब्ध । केल्या जातील, त्या कुठे मिळतील याची माहिती हिंदी आणि इंग्रजीसह त्यांच्या प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध केली जाते. यासाठी संस्थेने । देशातील कोणत्याही व्यक्तीला सहज माहिती मिळेल, अशी व्यवस्था दूरध्वनीवरून सुरू केली आहे.

अपंगत्व, कर्णबधिरता आदींची माहिती सहजपणे लक्षात यावी, यासाठी ९५ हून अधिक प्रकारची छापील माहिती संस्थेने तयार केली असल्याचे या संस्थेच्या सामग्री विकास विभागाचे विभागप्रमुख डॉ. अरूण बनिक यांनी सांगितले. यासोबतच कर्णबधिरता, त्याची कारणे, उपाय, वाक् व भाषादोष, विविध प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम, सेवा-सुविधा आणि सर्वसामान्यांनाही कळेल या भाषेत माहिती पुस्तिका उपलब्ध करून दिल्या जातात. या पुस्तिका देशातील सर्वच मुख्य भाषांत उपलब्ध आहेत. आतापर्यंत माहिती पुस्तके आणि जनजागृतीच्या सामग्रीच्या तब्बल दहा लाखांहून अधिक प्रतींचे वितरण करण्यात आले आहे.

**- संजीव वेलणकर. पुणे.**


## मनमोहन सिंग

भारताचे तेरावे पंतप्रधान व एक अर्थतज्ज्ञ. आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या पर्वाचे शिलेदार म्हणून ख्यातकीर्त. त्यांचा जन्म पंतप्रधान मनमोहन सिंग सुशिक्षित व सुसंस्कारित कुटुंबात गुरुमुखसिंह कोहली व अमृता कौर या दांपत्यापोटी पाकिस्तानमधील गाह पंतप्रधान मनमोहन सिंग (पूर्वीचे पश्चिम पंजाब ) येथे झाला. प्रारंभीचे शिक्षण जन्मगावी आणि पुढील हिंदू महाविद्यालय, चंडीगढ येथे. ते पंजाब विद्यापीठातून बी.ए. (१९५२), एम्.ए. (१९५४) प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. केंब्रिज विद्यापीठात अर्थ शास्त्र विषयातील पदवीसह ते प्रसिद्ध डम स्मिथ पारितोषिकाचे (१९५६) मानकरी ठरले. 'इंडियाज एक्सपोर्ट कॉम्पिटेटिव्हनेस ' ह्या संशोधनात्मक प्रबंधासाठी त्यांना पीएच.डी. (ऑक्सफर्ड विद्यापीठ) मिळाली. त्यांचा विवाह १४ सप्टेंबर १९५८ रोजी गुरुशरण कौर यांच्याशी झाला असून त्यांना उपेन्दर, दमन, अमृत ह्या तीन उच्चशिक्षित कन्या आहेत.

प्रशासकीय सेवेत जाण्यापूर्वी त्यांनी पंजाब विद्यापीठात (१९५७ - ६५) आणि दिल्ली विद्यापीठात (१९६६-६९) अनुक्रमे अर्थशास्त्र व आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयांचे अध्यापन केले. जवाहरलाल नेहरु विद्यापीठातही (दिल्ली) ते सन्माननीय प्राध्यापक होते.

मनमोहन सिंग १९७१ मध्ये प्रशासकीय सेवेत विदेश व्यापार विभागात आर्थिक सल्लागार म्हणून रुजू झाले. ते अर्थ मंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार (१९७२-७६) होते. तेथील कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सदस्य (१९७६-८०) तसेच नियोजन आयोगाचे सदस्य-सचिव (१९८०-८२) म्हणून नियुक्ती झाली होती. पुढे इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांनी आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य आणि भारत-जपान संयुक्त अभ्यास समितीचे अध्यक्ष (१९८०-८२) म्हणून काम केले. त्यांची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर (सप्टेंबर १९८२- जानेवारी १९८५) म्हणून नियुक्ती झाली होती. दरम्यानच्या काळात अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये तसेच संयुक्त राष्ट्रांच्या सचिवालयात, व्यापार विभागात पुरवठा विभागाचे प्रमुख, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक आणि आंतरराष्ट्रीय फेररचना व विकास बँक यांच्या संचालक मंडळांत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. शिवाय भारतात ते नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष (१९८५-८७) होते. तसेच त्यांच्याकडे १९८७-९० यांदरम्यान जिनीव्हा येथील गरीब व विकसनशील देशांच्या उन्नतीसाठी नेमलेल्या दक्षिण आयोगाचे सरचिटणीसपद सोपविण्यात आले. चंद्रशेखर पंतप्रधान असताना भारताच्या मुख्य आर्थिक सल्लागारपदी (१९९०-९१) त्यांची नियुक्ती झाली. पुढे काही महिने त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

## शब्दकोडे-१८८



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव ६. पोलिसांवरील अधिकारी९. ही धरून लगडी घालतात ११. छिद्र, जखम१२. जय पराजय १४. घोंगड्या विणणारी जमात१६. मोठा हातोडा १७. रम्य दृश्य १९. धमनी २१. मला २४. उपहास २५. शरीर २७. खरकट्याचा ढीग २९. श्रीकृष्णाचे एक नाव ३१. वचक, भीती ३२. हिंदीत शरीर ३३. बारीक झिणझिण ३५. वाक्बगार ३७. अभिमन्यूला ठार मारणारा ३९. फायदा ४०. दहा अब्ज ही संख्या ४१. लाज ४३. रसाळ ४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी ४६. जाणे-येणे, वहिवाट ४८. पायताण ४९. सीतेची जुळी मुले ५१. खदक ४३. '--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान है' ५४. पौराणिक आयुध ५५. ओझी उचलणारा ५७. सत्त्व ५९. जोखीम ६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट ६२. पोहणे ६४. गवताचे रुंद पान ६५. निवासस्थान ६६. मत देणारा ६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा ६९. भित्रा, पळ काढणारा ७०. कुलीन ७२. जाणकार ७५. पालव ७७. ढीग ७९. रक्तवाहिन्या ८०. जम ीनदार ८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण २. बाहेरच्या विरूद्ध ४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश ५. छोटी ६. सैनिक ७. जपणे ८. आवड ९. घट्ट, तणावाची स्थिती १०. उष्ण १३. प्रजा १५. दृष्टीभेट १६. गर्द, गच्च १८. वेगाने २०. शीतपेय २२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे २३. खरे तर हे काही जेवण नव्हे! २६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला! २८. माज ३०. आवाज, गोंगाट ३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम ३५. विनाश ३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते ३८. मृत्यूचा राजा ४१. संभवनीय ४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन ४४. नूतन ४७. माळी, बागवान ५०. काढलेली खोडी ५२. जाडसर पीठ ५३. सर्व ५४. मारुती, भीम ५५. हिंदुस्थानी ५६. उपस्थित ५८. उत्सवाचे दिवस ६०. च्या बद्दल ६३. तरतूद ६४. साडी ६५. जात्याचा आवाज ६६. मधुमक्षिका ६७. शील, उदारता ६८. गव्हाचे बारीक पीठ ६९. पुन्हा ७१. नवरा ७३. नवरत्नांपैकी एक ७४. खेडे ७६. फितुरी ७७. भूपती ७८. माळ, हार

### शब्दकोडे १८७ चे उत्तर

**आडवे उत्तर**


१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.सम रस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.राम ायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

**उभे उत्तर**

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अम ावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ

## सोभाव (सुत्र १०)

### पंचज्ञानेद्रिंयामाहीन चांगला सोभाव घडविता येस



डॉ.रा.प्र.पारनेरकर

धाकलपने पोरग जी वस्तू देखस तिले तो हातमा धरस.आनीहातमातली वस्तू तो लगेच तोंडमा घालस. पंचज्ञानेद्रिंयासपैकी समदामधून पयले ज्ञानेद्रिंय शहाना व्हतस.आनी ह्याले सबद आयकस तव्हय कान, डओयामाहीन दिखनार रुप हायी शिक्शन त्याले लेवानी गरज पडस जर त्याले हायी शिक्शन दिध नै ते मूर्ती मंत सौंदर्य डोयासमोर उभं राहिसन त्याले सौंदर्य दिखाव नै.डोयाले हायी दृष्टी येवानाकरता बुद्धीना संस्कार आनी सह्यदयनीपन भलतीच गरज पडस.ज्ञानेंद्रिय म्हन्जे नाक हायी साधारनपने सर्वसाधरन मानूसले जोयजे तेवढं ईकसित व्हत नै.त्याले सुगंध वास चांगला ,वाईट असा दुर्गंध एवढच त्याले ग्यान व्हस.खरं सांगाले गये ते समदास पंच इंद्रियास्ले चांगला संस्कार करीसन त्या जास्तीतजास्त हुशार करना पडतस.सोताव्हईहन त्यासनी वाढ फारसी व्हत नै. ज्या नी त्या समद्या गोष्टीसन शिक्शन देनं पडस नै ते लेन पडस.हायी जानीव सहसा कोनले -हात नै. सोतान्या नै ते त्या पोरकट वयना मानले सोताची नै ते त्यानी पंचज्ञानेद्रिंये त्या ठिकाने कार्यक्षम शेत का नै ह्यानाकडे देखाले कोनापाच येय -हात नै.जसशहानपन बाबतमा देखाले गये ते मानूसले भावना पोटमायीनच त्याले समद मियस असच दिखायी पडस.अशी पक्की समज समदासमा -हास.तशीच पंचज्ञानेद्रिंयास्नी वाढबी व्हवाले लागस तसं ती सवयसोबत सहज व्हत ने. यानी स्पष्ट कल्पना मानूसले व्हवाले जोयजे पन तस व्हत नै.त्यानापेक्षा ती सहज आपोआप होनारी गोट शे असा पक्का समज व्हवामुये ती दिखायी देस.त्यामयेह्याईषयी जितली कायजी लेवाले जोयजे तितली लेवावस नै.या पंचज्ञानेद्रिंयासले नेमकं चांगलं वयन जर लाव नै त्यास्नावर ध्यान ठी नै ते त्याना वाईट परिनाम मनवर व्हस आनी त्याना सोभाव तसाच घढवता येत नै. ह्या प्रकारनी म्हना की त-हा म्हना पन अशी परिस्थिती निरमान व्हस.असच म्हनता येस की जर पंचज्ञानेद्रिंयासले चांगलं सुसंस्कारित जर करता उनं नै ते त्याना परिनाम मानूसना सोभाववर हमखास व्हस आस दिखस.तो असा निर्बुद्ध जनावरना गनतीमा मोजावस.ज्या ज्या गोष्टीसमां सुसंस्कृत मानूसले आनंद व्हत -हास तठे तठे तो आनंद देखीसन याले येड ते लागनं नै अशी शंका निरमान व्हस. त्याच दृष्टीमा त्यानाकडे देखानी भावना बी बनस.तधय असा मानूसवर संस्कार व्हवाले भलतच कठिन जास.असा मानसे आयुष्यभर येडाच व्हतस.शहाना व्हतच नै.असाचमानसे समाजना गुन्हेगारी प्रवृत्तीना तयार व्हतस.या पंचज्ञानेद्रिंयासनी जेवढी वाढ कमी व्हस तेवढीच हायी गुन्हेगारी वृत्ती नै ते संभावना जास्त शिकिसन नै ते पुढे त्याना समोर जीव दिधा तरी त्या सुधाराना नाव ल्हेतस नै त.हाई परिसिमा सोडी तरी मानूस जेवढा जास्त सुसोभावी नी मोठ व्हावा असं आपन म्हनतस.एवढासाठीच त्याना पंचज्ञानेद्रिंय सुसंस्कारित आनी तीक्श्न होन हायी आवश्यक शे.जर ह्या चांगला टोकदार झाया नै ते समद्या अपेक्षाना भंग व्हयी जास.ह्याना करता आपला सोभाव बनावना व्हयीन त्यानी या पंचज्ञानेद्रिंयासवर चांगली ध्यान ठेवाले जोयजे.हायीच महत्वानी शे.

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**


हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.

**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.

**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### महिलेचा आवाज काढत फसवणूक

**नाशिक ।** महिलेचा आवाज काढून संपर्क साधणाऱ्या संशयिताने एकाला आजारपणाचा बहाणा करून एक लाख ९६ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अर्जुन तात्याराव उफाडे असे संशयिताचे नाव आहे. अमोल बाळासाहेब अहिरे यांच्या फिर्यादीनुसार, संशयित उफाडे याने ईश्वरी मुंढे या नावाने ओळख सांगत महिलेचा आवाज काढून अमोल यांच्याशी ओळख वाढविली. त्यानंतर अमोल अहिरे यांनी पैसे परत मागितले असता अमोल यांना दमदाटी करीत फसवणूक केली.

### अंबड पोलिस ठाण्यातील गणपती बाप्पाचे विसर्जन

**धुळे ।** अंबड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी प्रथमच अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी पोलिस ठाण्यात गणरायास विराजमान केले होते. पाचव्या दिवशी पोलिस ठाण्यात सत्यनारायण पूजा झाल्यावर गणरायाचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनला अंबड पोलिसांनी पारंपारिक वस्त्र परिधान करीत संबळावर नृत्य केले.

# उत्तम आरोग्य, ग्रंथ वाचन, सुसंवाद ही आनंदी आयुष्याची त्रिसूत्री - मंत्री भुजबळ





**नाशिक । प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक होणे हा आयुष्याचा एक महत्वाचा टप्पा असून उत्तम आरोग्य, ग्रंथ वाचन व सुसंवाद या त्रिसूत्रीचा अंगिकार केल्यास आपण आनंदी आयुष्य जगू शकतो असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ सभामंडप लोकर्पणप्रसंगी मंत्री छगन भुजबळ बोलत होते. यावेळी प्रांत अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी किरण देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अभिजित शेलार, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, ड.बाबासाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष भोलानाथ लोणारी, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र काले, शहराध्यक्ष दिपक लोणारी, गोविंदराव खराटे, संतोष खैरनार, भाऊसाहेब धनवटे, सुभाष गांगुर्डे, गोटू मांजरे, मलिक मेंबर यांच्यासह श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.




मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, वयाची साठी ओलांडल्यानंतर मनुष्यास ज्येष्ठत्व येते. वयाच्या या वळणावर प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आयुष्यात योग्य बदल करून घेतले पाहीजेत. उत्तम आरोग्य हिच आपली संपत्ती आहे. यासाठी नियमित फिरणे, व्यायाम करणे, योगा करणे आणि आहारात आवश्यक बदल करणे हे तितकेच महत्वाचे आहे. चांगले ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्र वाचन करणे, वयानुरूप खेळ खेळणे, मनोरंजनात्मक छंद जोपासणे हे गरजेचे असून यातून जगण्याची नवी दिशा मिळते. श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातील सदस्य नागरिक येथे एकत्र येतात, एकमेकांशी संवाद साधतात यातून सुख-दु:ख, एकमेकांचे विचार यांची देवाणघेवाण होते. यामुळे मन मोकळे होवून प्रफुल्लीत राहते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भोलानाथ लोणारी यांनी केले.

# 'लाच नको, लाज बाळगा' - नितीन देवरे

### भ्रष्टाचार आणि भाईगिरी हद्दपारीसाठी गणेशाला साकडे

**नाशिक । प्रतिनिधी**




समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो यामुळे प्रत्येक सणाला मुद्राय फॉउंडेशन तर्फे समाजसेवेचे कार्य करण्यात येते. प्रत्येक वर्षी गणेश उत्सवानिमित्त देवरे-पाटील परिवारातर्फे घरगुती गणेशाच्या सजावटीमध्ये सामाजिक संदेश असलेल्या सजावटीला प्राधान्य देण्यात येते. मतदान जनजागृती, सार्वजनिक शौचालय निर्मिती, वही-पेन दान उपक्रम घेऊन घरगुती गणेश उत्सवात सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी प्राधान्य देण्यात येते. यावर्षी देखील सामाजिक उपक्रम हातात घेऊन नाशिक शहरात राजरोसपणे होणारा भ्रष्टाचार आणि भाईगिरी पूर्णपणे नष्ट होण्यासाठी जनजागृतीवर सजावट करण्यात आली आहे. यामध्ये महिला सिंघम म्हणून प्रसिद्ध अँटी करप्शनच्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांची प्रतिमा आणि त्यावर 'लाच नको, लाज बाळगा' अश्या प्रकारच्या बॅनरचा गणेशाच्या सजावटीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

गणेशाच्या दर्शनासाठी आलेल्या नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी हा उद्देश यामागे असल्याचे नितीन देवरे यांनी सांगितले. प्रत्येक वर्षी सामाजिक संदेश असलेले सजावटी बघून नागरिकांकडून तसेच आरती निमित्त घरी येणाऱ्या नेते मंडळी व सामाजिक सेवकांकडून कौतुक होत असते. घरगुती गणेशउत्सवा निमित्त दिलेल्या सामाजिक संदेशामुळे समाज व्यवस्थेत थोडी जरी सुधारणा झाली तरी गणेश उत्सव मनापासून साजरा झाल्याचे समाधान मिळते. या उपक्रमात मुद्राय युवा फॉउंडेशन सहकार्य म्हणून कार्य करते. गणपती बाप्पा घरात साजरा होवो किंवा सार्वजनिक मंडळात साजरा होवो त्यामध्ये मूर्ती च्या आकाराला महत्व न देता त्या उत्सवात सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले तर त्या सणाला अधिक महत्व प्राप्त होते. आणि मूर्ती पेक्षा किर्ती महान या म्हणीला महत्व प्राप्त होते असे मत मुद्रायच्या सदस्यांनी व्यक्त केले.

# महास्वयंम वर तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाइन

**धुळे ।** कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत महास्वयंम पोर्टलवर ऑनलाइन सुविधा घेताना लाभार्थी घटकांना येणाऱ्या अडचणी, तक्रारींचे निराकरण करण्यासाठी हेल्पलाइन सुरू करण्यात असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी यांनी दिली.

# पोलिस आयुक्तांकडून गणेशोत्सव उत्कृष्ट मंडळांना पुरस्कार

### झोन २ ची समिती जाहीर

**सिडको । प्रतिनिधी**

नाशिक शहराचे पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी शहरात परिमंडळ १ व परिमंडळ २ साठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना रोख स्वरूपात पुरस्कार जाहीर केले आहेत. यात परिमंडळ २ च्या परिक्षण समिती सदस्य झोन २ च्या उपायुक्त मोनिका राऊत यांनी जाहीर केले.

नाशिक शहराचे पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी शहरात परिमंडळ १ व परिमंडळ २ साठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना रोख बक्षिसे जाहीर केली यात प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच दोन उत्तेजनार्थ असे दोन्ही परिमंडळला स्वतंत्र जाहीर केले आहेत. यात गणेशोत्सव पुरस्कारचे निकष जाहीर केले आहेत. यात गणेश मुर्ती स्थापना व संरक्षणार्थ केलेली व्यवस्था (१० गुण), समाजपोयोगी कार्यक्रम व स्वयंसेवक नेमणूक (२० गुण), पर्यावरण गणेशमुर्ती (१० गुण), नियमांचे पालन (१० गुण), विसर्जन मिरवणुक नियोजन (२० गुण), पारंपारिक वाद्य स्वरूप व शिस्त (३० गुण), विसर्जन मिरवणुक शिस्त व नियमांचे पालन (१० गुण), मिरवणुकीत सातत्य ठेवणे (२० गुण), विसर्जन मिरवणूक वेळेत पार पाडणे (१० गुण), वाद्य वेळेत बंद करणे (१० गुण) असे एकुण १५० गुण ठेवले आहे. या मंडळांच्या परिक्षणसाठी पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ २ च्या उपायुक्त मोनिका राऊत यांच्या अध्यक्षतेखाली समिती सदस्य जाहीर केलेत. या समितीत अंबड विभाग सहायक पोलिस आयुक्त शेखर देशमुख. नाशिकरोड विभाग सहायक पोलिस आयुक्त आनंदा वाघ, नाशिक महापालिका उपायुक्त प्रशांत पाटील, शहर शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग जाधव, सेवानिवृत्त प्राचार्य केशव मोरे, कला शिक्षक जगदीश डिंगे, पत्रकार राजेंद्र शेळके या सदस्यांची समिती जाहीर केली आहे.

# आंतरराज्यव्यापी वधू-वर पालक परिचय मेळावा १० डिसेंबरला

**सिडको ।** अखिल भारतीय क्षत्रिय अहिर शिंपी समाज मध्यवर्ती संस्था संलग्न, हितवर्धक मंडळ, सिडको नविन नासिक यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराज्य व्यापी वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन दि.१०डिसेंबर रोजी नाशिक येथील जनार्दन स्वामीआश्रम, मौनगिरी हॉल, तपोवन, औरंगाबादरोड येथे होणार असल्याचे जाहीर केले आहे.

या वधू-वर पालक परिचय मेळाव्याच्या फॉर्मचे प्रकाशन सिद्धी बँक्वेट हॉल आयटीआय पुलाजवळ सिडको, सातपूररोड येथे झालेल्या मध्यवर्ती संस्थेच्या बैठकीमध्ये मध्यवर्ती संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष वनेश खैरनार यांच्यासह मध्यवर्ती संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी यांच्या उपस्थितीत होते. हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष तुषार गवांदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून विवाहइच्छुकांनी स्वयम: स्फूर्तीने मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. यावेळी पदाधिकारी, समाजसेवक आदी उपस्थित होते. आभार संमेलन अध्यक्ष सचिन बोरसे यांनी मानले.

# आ.फरांदे यांच्यातर्फे आयुष्यमान कार्ड वाटप विशेष मोहीम

### शहरात आठ ठिकाणी कार्यक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**

आयुष्यमान भारत योजनेचा काल ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आ. देवयानी फरांदे यांच्याकडून शहरात विविध आठ ठिकाणी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे मोफत कार्ड वाटप कार्यक्रम घेण्यात आलेत.

गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या सुविधा योग्य दरात मिळाव्या यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनेचा पाचवा वर्धापन दिन काल असल्याने त्यानिमित्त नाशिक शहरातील नागरिकांना महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचे कार्ड उपलब्ध करून देण्यासाठी विविध आठ ठिकाणी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना कार्ड वाटप कार्यक्रम घेण्यात आला. नाशिक शहरात श्री दर्शन अपार्टमेंट




गजानन महाराज मंदीरजवळ, पाथर्डीरोड इंदिरानगर. मेहबूबनगर, वडाळागाव. बरखा बहार सोसायटी, रविंद्र विद्यालय जवळ, व्दारका. युनिटी गोल्ड बिल्डींग, जलसा लॉन्स, अशोकामार्ग. गंगासागर बंगला, शहर प्राथमिक आरोग्य केंद्र, बारा बंगला फिल्टरेशन, सिद्धार्थनगर. रामसीमा बंगलो, प्लॉट नंबर २१ आनंदनगर, उपनगर. नंदन अपार्टमेंट, ऑफिस नं. १ विनयनगर. दुदाधारी मस्जिद, कथडा, जुने नाशिक या ठिकाणी आयुष्यमान भारत कार्ड वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या शिबिरांच्या माध्यमातून जवळपास ९०० नागरिकांना कार्डचे वाटप करण्यात आले. आ. देवयानी फरांदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपातही काही नागरिकांना कार्ड वाटप करण्यात आले. यासाठी माजी नगरसेवक शिवाजी गांगुडे, अनिल ताजनपुरे शाम बोरदे, रशिदा शेख़, मिलिंद भालेराव, शहिन मिर्ज़ा, यशवंत निकुळे, बब्लू शेख़, सुनील देसाई, अनिल भालेराव आदी उपस्थित होते. तर पप्पू शेख यांनी या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून कामकाज पाहिले.

# अवयवदान दात्याचे सरकारी इतमामात अंत्यसंस्कार व्हावे

### कृष्णा चांदगुडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात अवयवदानाचे प्रमाण अत्यल्प असल्याने सरकारने अवयवदान करणाऱ्या दात्यांचे अंत्यसंस्कार हे सरकारी इतमामात करावेत, त्यामुळे जनजागृती होऊन अवयवदानचे प्रमाण वाढेल, अशी विनंती अवयवदान चळवळीचे कार्यकर्ते कृष्णा चांदगुडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, अवयवदान चळवळीचे कार्यकर्ते हे अवयवदान संबधी प्रबोधनाचे काम करत असतात. सरकारही त्याबाबत जनजागरण करत आहे. परंतु त्यास फारसा प्रतिसाद मिळत नाही. काही दिवसांपूर्वीच तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के स्टॅलिन यांनी अशी घोषणा केली की, तामिळनाडूतील कुणी व्यक्तीने अवयवदान केले तर सरकारी इतमामात त्याचे अंत्यसंस्कार केले जातील. ही घोषणा आश्वासक असून अवयवदान चळवळीला बळ देणारी आहे. अवयव दात्याचा सन्मान करणारी आहे. त्यामुळे नक्कीच अवयवदानाचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे. एका मेंदूमृत व्यक्तीच्या अवयवदानाने सात ते आठ व्यक्तींचे प्राण वाचतात. परंतु भारतात अवयवदानचा संकल्प करून प्रतिज्ञापत्रक भरण्याचे प्रमाण हे केवळ ०.०१ टक्के इतके कमी आहे. प्रत्यक्षात अवयवदानाचे प्रमाण त्यापेक्षाही कमी आहे. तर काही देशात हेच प्रमाण ३५ टक्के एवढे आहे. स्पेन हा देश अवयवदानात प्रथम क्रमांकावर आहे. श्रीलंकेत मानवी अवयव ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून ग्राह्य धरली जाते. म्हणून स्वतः ची डोळ्यांची गरज भागवून ते डोळे निर्यात करतात. आपल्याकडे असे कायदे होण्याची अवश्यकता आहे. महाराष्ट्रात अवयवदानाचे प्रमाण अत्यल्प असल्याने आपण अवयवदान करणाऱ्या व्यक्तींचे सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्याची योजना सुरू करावी, त्यामुळे अवयवदानाचे प्रमाण वाढून अनेक रुग्णांना जीवदान मिळेल. या विनंतीचा गांभीर्यपूर्वक विचार व्हावा, अशीही मागणी कृष्णा चांदगुडे यांनी केली आहे.

प्रोसेज जमा
ॲड. दिपक जी. बोरसे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अ.नं. २१५/२०२३

१) गं. भा. संगिताबाई भागुजी बस्ते, वगैरे - ३ ...**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कुणीही नाही - जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. २०/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे कै. भागुजी माधव बस्ते यांचे निधन दि. १६/०७/२०२३ रोजी मौजे जैताणे ता. साक्री जि. धुळे येथे मयत झाले आहेत. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते / संबंध |
| --- | --- |
| १) गं. भा. संगिताबाई भागुजी बस्ते | -पत्नी |
| २) कु. कावेरी भागुजी बस्ते | - मुलगी |
| ३) चि. आकाश भागुजी बस्ते | - मुलगा |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. २७/१०/२०२३ रोजी स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का

कामगिरी कारकुन
दिवाणी न्यायालय कोर्ट साक्री

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, साक्री

# आवश्यक पोषक तत्व मिळत नसल्याने सांधेदुखीमध्ये वाढ- डॉ. चोकसी

### एकता ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान

**नाशिक । प्रतिनिधी**






सध्या लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांमध्ये सांधेदुखी ही एक समस्या प्रामुख्याने पाहायला मिळते असून ती समस्या बहुतेक वेळा वय वर्ष ४० नंतर सुरु होत असते. परंतु हल्ली बदललेली आहार पद्धती आणि जीवनशैली यामुळे प्रत्येक जण कामांमध्ये व्यस्त असतो. बहुतेक वेळा आपण कधीही कोणत्याही प्रकारचा आहार सेवन करतो आणि अनेक वेळा आपल्या शरीराला आवश्यक ती पोषक तत्व सुद्धा प्राप्त होत नाही. म्हणूनच शरीरामध्ये अनेकदा कॅल्शियमची कमतरता निर्माण होते. परंतु ही कॅल्शियमची कमतरता भविष्यात धोक्याची घंटा तर ठरणार नाही ना? याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी असे प्रतिपादन नारायणी हॉस्पीटलचे सांधेबदल तज्ञ डॉ. मनिष चोकसी यांनी केले आहे.

एकता ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात डॉ. चोकसी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष प्रतापराव वाढणे, सचिव सुधाकर भोई, लोकज्योती मंचचे खजिनदार जितेंद्र येवले उपस्थित होते. डॉ. मनिष चोकसी म्हणाले की, शरीरातील विटामिन, मिनरल्स आणि आवश्यक ते पोषक घटकांची नियमितपणे तपासणी करायला हवी. पोषक तत्व कमी झाल्याने मान दुखी, गुडघे दुखी, कंबरदुखी यासारख्या वेदना त्रास देतात. या समस्या प्रत्येकाच्या शरीरानुसार वेगळे कारण सुद्धा तितकेच कारणीभूत ठरतात. ज्येष्ठांनी आपल्या आनंदी जीवन जगण्यासाठी प्रयत्नशील रहायला हवे. स्वत:साठी वेळ द्यायला हवा तसेच ज्या गोष्टीत आनंद मिळेल त्या गोष्टींमध्ये रममाण व्हायला हवे असेही आवाहन त्यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अभ्यासिका सुरू

**धुळे ।** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शहर व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्यात आल्याची माहिती धुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य रा. सु. मानकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये दिली. अभ्यासिकेचे नुकतेच शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. आर. जी. वाडेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटनप्रसंगी उपप्राचार्य आर. पी. पगारे, सर्व गटनिदेशक, शिल्पनिदेशक उपस्थित होते. गटनिदेशक एस. एन. इंगळे यांनी आभार मानले.

### गावातून एकाची दुचाकी लांबविली

**धुळे ।** तालुक्यातील नेर गावातून एमएच १८ एके ५५२३ क्रमांकाची १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने लांबविली. ही घटना ७ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली. दुचाकी कुठेही मिळून आली नाही. याप्रकरणी गोकूळ धनराज माळी (वय २७) या तरुणाच्या फिर्यादीवरुन शनिवारी तालुका पोलिसात गन्हा दाखल झाला.

# जयहिंद सोसायटीच्या निवडणुकीत विकास पॅनलला १२ तर, नानासाहेब झेड.बी. पाटील गटाला ३ जागा





**धुळे । प्रतिनिधी**

जयहिंद को-ऑप हौसिंग सोसायटीच्या १५ जागांसाठी रविवारी निवडणूक झाली. या पंचवार्षिक निवडणुकीत विजय पाटील यांच्या विकास पॅनलला सर्वाधिक १२ जागा मिळाल्या. तर विद्यमान चेअरमन डॉ. अरुण साळुंखे यांच्या नानासाहेब झेड. बी. पाटील गटाला ३ जागांवर समाधान मानावे लागले. निकालानंतर विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करत जल्लोष केला.

येथील जयहिंद को-ऑप हौसिंग सोसायटीची पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. १५ जागांसाठी ३० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. जयहिंद विद्यालयात सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यासाठी एक मतदान केंद्र होते. २३९ पैकी २३२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. ९६ टक्के मतदान झाले. मतदानानंतर लागलीच मतमोजणीची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात विजय पीतांबर पाटील यांच्या विकास पॅनलला १२ जागा तर डॉ. अरुण साळुंखे यांच्या नानासाहेब झेड. बी. पाटील पॅनलला ३ जागावर समाधान मानावे लागले.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमोल थंडाईत यांनी कामकाज पाहिले. त्यांना राजेंद्र विरकर, नितेश महाले, सुनील मोगरे, रवींद्र चौधरी, नवनीत गोसावी, नागेश पुकळे, संदीप विधाते, गोपाल पाटील, प्रदीप पाटील, दिलीप पाटील, किशोर माळी यांनी सहकार्य केले.

### विजयी उमेदवार व मते

**सर्वसाधारण विजय पीतांबर पाटील (१७६), चंद्रशेखर इच्छाराम पाटील (१५३), अविनाश वसंतराव देवरे (१५१), विश्वेश्वर दलपतराव देवरे (१३३), शरद शंकरराव बच्छाव (१३१), विजय गुलाबराव बोरसे (१२६), ॲड. राजेंद्र नथ्थू पाटील (१२२), नीलेश गुलाबराव पाटील (११९), प्रमोद गुलाबराव पाटील (११७), भूषण शिवाजीराव सावंत (१११) इतर मागासप्रवर्ग डॉ. अरुण झुलाल साळुंखे (१४४), अनुसूचित जाती / जमाती मोहन चिंतामण मोरे (२२४), विशेष मागास प्रवर्ग, डॉ. नितीन काशिनाथ काकडे (१३३), महिला प्रवर्ग भारती रवींद्र भामरे (१३४), नीलिमा हिंमतराव पाटील (१२२).**

**मतदारांनी दिलेला कौल आम्हाला मान्य आहे.**
**-डॉ. अरुण साळुंखे, नानासाहेब झेड.बी. पाटील पॅनल गट प्रमुख**

**भ्रष्ट आणि मनमानी कारभाराला सभासद कंटाळले होते. बहुमतात पॅनल आल्याने त्यांची जागा दाखविली आहे.**
**- विजय पाटील. विकास पॅनल प्रमुख**

# रावेर ग्रामपंचायततर्फे आ.कुणाल पाटलांचा सत्कार



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने मंजुर करण्यात आलेल्या नंदाभवानी मंदिर परिसर रावेर ता.धुळेच्या पर्यटन व तिर्थस्थळ विकासाच्या कामाची स्थगिती आ.पाटील यांनी उठविली. त्याबद्दल आ.कुणाल पाटील यांचा रावेर ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, धुळे तालुक्यातील नंदाभवानी मंदिर परिसर रावेरच्या तिर्थस्थळ आणि पर्यटनस्थळ म्हणून विकासासाठी आ.कुणाल पाटील यांनी एकूण ४ कोटी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजुर केला होता. मध्यंतरी महाविकास आघाडी सरकार बदलल्यान तांत्रिक कारणास्तव सदर कामावर स्थगिती आली होती. त्यानंतर आ.कुणाल पाटील यांनी विशेष प्रयत्न करुन या कामाची स्थगिती उठविली आहे.ंदाभवानी मंदिर परिसर रावेर ता.धुळेच्या पर्यटन व तिर्थस्थळ विकासाच्या कामाची स्थगिती उठविल्याबद्दल रावेर ता.धुळे ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्यावतीने आ.कुणाल पाटील यांचा सत्कार करुन आभार मानले. यावेळी लोकनियुक्त सरपंच साहेबरव देवरे, दादाभाई खैरनार, गुलाब जाधव, खटाबाई पवार, बन्सी अहिरे, रमेश महानुरकर, नवनाथ देवरे,योगेश देवरे, मनिष देवरे, छोटू बेडसे,अनिल साळुंके, नितीन साळुंके, नितीन बोढरे, दिलीप देवरे, मनोज बाविस्कर, सचिन पाटील, निंबाजी देवरे, संतोष अहिरे, राजेंद्र बोढरे, लक्ष्मण बापू, रविंद्र महाले, जगदिश देवरे, एजली देवरे, मच्छिंद्र देवरे, रविंद्र देवरे, अशोक मराठे, भाईदास देवरे, अनिता देवरे, तुकाराम देवरे, सोपान वाघ, वाल्मिक महानोरकर, राजेंद्र गोलाईत, सुभाष गायकवाड, नामदेव देवरे, विकास देवरे, रघुनाथ देवरे,भुषण देवरे, भिमराव अहिरे, नाना थोरात आदी उपस्थित होते.

# श्री सद्गुरू खंडोजी महाराज यात्रोत्सव निमित्ताने पिंपळनेर येथे भव्य कुस्त्याची दंगल संपन्न

**पिंपळनेर । प्रतिधिधी**



१९५ वर्ष परंपरा असलेले पिंपळनेर येथील श्री सद्गुरू खंडोजी महाराज यात्रोत्सव निमित्ताने भव्य कुस्त्याची दंगल संपन्न झाली. या कुस्त्यासाठी महाराष्ट्र,गुजरात,एम पी,उत्तरप्रदेश येथून कसदार पाहिलवनांच्या कुस्त्या संपन्न झाल्या. गव्ह. कॉन्ट्रॅक्टर विलास जगताप यांनी दोन हिंद केसरी मल्लची कुस्ती साठी २१००० रुपयांचे बक्षीस दिले.ही कुस्ती लक्षवेधी ठरली.

खंडोजी महाराज क्रीडा संकुलावर कुस्त्यांचे उदघाटन हभप योगेश्वर महाराज देशपांडे, मा खा.बापू चौरे, जिल्हा कॉं अध्यक्ष शाम सनेर, यांनी पहिली मनाची कुस्ती लावली.ही कुस्ती जगदीश जाधव पहिलवान पिंपळनेर यांनी जिंकली. त्याला मनाची गदा व रोख रक्कम देण्यात आली. त्यानंतर धुळे,चाळीसगाव, संभाजी नगर, नांदेड, परभणी, मालेगाव, नाशिक, नगर, सांगली येथील मल्लच्या कुस्त्या संपन्न झाल्या. शेकडो कुस्ती शौकिनांनी कुस्त्यांचा आनंद घेतला. यावेळी व्यासपीठावर जि प कृषी सभापती हर्षवर्धन दहिते, सरपंच देविदास सोनवणे, उपसरपंच विजय गांगुर्डे, मा सभापती संजय ठाकरे, स पो नि श्रीकृष्ण पारधी, युवा नेते प्रवीण चौरे, विलास जगताप, इंजि अशोक सोनवणे, प स उपसभापती एड नरेंद्र मराठे, प स सदस्य देवेंद्र गांगुर्डे, सुभाष कोठावदे, इंजि विजय नंदन, ग्रामविकास अधिकारी एच एन अहिरे, प्रमोद गांगुर्डे,संजय जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. पंच म्हणून राजेंद्र गांगुर्डे,संभाजी ढोले,प्रताप मराठे,जे टी नगरकर, वसंत चौधरी, भैय्या बाविस्कर यांनी काम पाहिले. या कुस्त्या यशस्वी करण्यासाठी कुस्ती समितीचे सदस्य पी एस पाटील, प्रा किरण कोठावदे, पांडुरंग चौधरी, सतीश पाटील, प्रताप आबा गांगुर्डे, प्रकाश कोठावदे, रवींद्र कोतकर, प्रमोद भावसार, मोतीलाल पोतदार, बाबा पेंढारकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन नगरकर यांनी केले. यावेळी पिंपळनेर पोलीसांतर्फे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# कोरके नगरात भरदिवसा घर फोडले; रोकडसह दागिने लांबविले!

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील मालेगाव रोडवरील कोरके नगर भागात शुक्रवारी भरदुपारी साधारण २ वाजेच्या सुमारास चोरांनी घराचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. घरातील कपाट फोडले आणि ४० ते ४५ हजार रुपये रोख व अंदाजे १६ तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने खळबळ उडाली असून चाळीसगाव रोड पोलिस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी यांसह श्वान पथक व ठसे तज्ज्ञ यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

शहरातील मालेगाव रोड परिसरात असलेल्या कोरके नगर प्लॉट नंबर ८० येथे राहणारे सुनील संपत नागणे हे पत्नी व मुलगा यांच्यासह राहतात. ते भारत दूरसंचार निगम या ठिकाणी नोकरीस आहेत. शुक्रवारी परिसरात गौरी गणपती पूजनाचा कार्यक्रम असल्याने नागणे यांची पत्नी व मुलगा

परिसरातच राहणारे नातेवाईक यांच्याकडे जेवणाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. मात्र जेवण केल्यानंतर नागणे यांचा मुलगा घरी आला असता त्याला घरातील कुलूप उघडले असल्याचे दिसून आले. पोलिसांनी श्वान पथकासह ठसे तज्ज्ञांना घटनास्थळी बोलावत चोरांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. घरातील कपाटातून ४० ते ४५ हजार रुपये रोख व अंदाजे १६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने लंपास झाल्याचे नागणे यांनी सांगितले. घटनास्थळी चाळीसगाव रोड पोलिस ठाण्याचे निरीक्षक धीरज महाजन, पोलिस उपनिरीक्षक विनोद पवार, संदीप ठाकरे, यांच्यासह पोलिस कॉन्स्टेबल सुनील पाथरवट, शोएब बेग, आतिक शेख, विनोद पाठक, विशाल गायकवाड, ठसे तज्ज्ञ धनंजय मोरे घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनीही गर्दी केली होती.



# हस्ती गुरूकल मुलांच्या सॉफ्टबॉल संघाची शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती गुरूकुल, दोंडाईचा येथील १४ वर्ष आतील मुलांचा सॉफ्टबॉल संघ नुकतेच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत सहभागी झाला होता. सदरची स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे यांचे तर्फे आदर्श माध्यमिक विद्यालय कळमसरे, शिरपूर येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर स्पर्धेत हस्ती गुरूकुल मुलांच्या सॉफ्टबॉल पटूंनी कौतुकास्पद कामगिरी बजावली; व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. यास्तव त्यांच्या संघाची आगामी विभागीय पातळीवर संपन्न होणाऱ्या शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी अभिनंदनीय निवड करण्यात आली. यात पुढील सॉफ्टबॉल पटूंचा समावेश आहे. ऋषभ धनराज, नयन पाटिल, ऋषिकेश थोरात, धनंजय पाटिल, मयुर धनगर, यश पाटिल, शैलेष धनगर, कृष्णा धनगर, स्वामी सोनवणे, प्रथमेश गिरासे, कृष्णा पाटिल, सार्थक चौधरी, अनिष पाटिल, नितीन अहिरे, नयनसिंग गिरासे. वरील सॉफ्टबॉल पटूंच्या संघाला हस्ती स्कूल क्रीडा विभाग प्रमुख प्रकाश खंडेराय, जितेंद्र सुरवाडे व क्रीडा शिक्षक निलेश धनगर यांचे मार्गदर्शन लाभले. तर शालेय समिती चेअरमन कैलास जैन तसेच मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी कौतुक केले. हस्ती गुरूकुल अशा स्वरूपाच्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होणेस प्रेरित करते. याद्वारा विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा कौशल्यांचा विकास साधला जातो.

# 'आमची शाळा आमचा बाप्पा' जिल्हा परिषद शाळेत अभिनव गणेशोत्सव

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद केन्द्र शाळा डांगशिरवाडे येथे गणेशोत्सवानिमित्त आमची शाळा आमचा बाप्पा या अभिनव उपक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत दिलीप अहिरे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आले. या उपक्रमामध्ये शाळेच्या उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी शाडूमाती पासून आकर्षक आणि सुबक गणेश मूर्ती तयार केल्या. त्यासाठी शाळेमध्ये एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पर्यावरण रक्षण व जलप्रदूषण टाळण्यासाठी आपण बनवलेल्या शाडू मातीच्या मूर्तीची स्थापना करण्याचा प्रतिज्ञापूर्वक संकल्प विद्यार्थ्यानी केला.

उत्कृष्ट मूर्ती तयार करणाऱ्या प्रथम तीन क्रमांकाच्या बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. शाळेमध्ये विद्यार्थ्यानी बनविलेल्या श्री गणेश मूर्तीची स्थापना करून बहुउद्देशीय शैक्षणिक साहित्याची आरास तयार करण्यात आली. यामध्ये गणिती क्रिया, इंग्रजी-मराठी शब्दसंपत्ती,श्रवण,भाषण,वाचन, लेखन या भाषिक कौशल्यांच्या विकसनासाठी गणेश उत्सवातून -गुणवत्तेकडे जाणारा हा अभिनव उपक्रम विद्यार्थी व पालक वर्गात कौतुकाचा विषय ठरत आहे. शैक्षणिक अनास्था व निरक्षरतेचे वाढते प्रमाण लक्षात घेता साक्षरता हे मोठे आव्हान शाळेसमोर आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना शाळेबद्दल, अभ्यास बद्दल गोडी निर्माण करण्याचे कार्य अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे केले जात आहे.जेणे करून स्थलांतर थांबवता येईल व सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी सुद्धा या उपक्रमामुळे आवडीने शाळेमध्ये येत आहेत व शाळेची १००% उपस्थिती पाहायला मिळत आहे. या उपक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**धुळे ।** नकाणे रोडवरील गुलमोहोर हौसिंग सोसायटी येथे राहणारी रेखा उर्फ वंदना बाळकृष्ण वाघ (वय ३५) या महिलेने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. घटना लक्षात येताच तिला खासगी वाहनाने हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासून मयत घोषीत केले.

# सन्मान आपल्या बाप्पांचा: साईकला बहुद्देशीय संस्थेचा अनोखा उपक्रम







### शहरातील खुनी गणपती, वंदे मातरम प्रतिष्ठान, कोंडाजी तालीम गणेश मंडळाचा सन्मान

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवात उत्सवाचे पावित्र्य राखले जावे, यासाठी मंडळांकडून नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. यासाठी मंडळाचे सदस्य दिवस रात्र मेहनत घेतात. म्हणून शहरातील खुनी गणपती,कोंडाजी तालीम गणेश मंडळ, पंचवटी मित्र मंडळ या मंडळाचा सन्मान करण्यात आला.

साईकला बहुदेशीय संस्था नेहमीच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत असते. धुळे शहरातील गणेशोत्साची अनेक गणेश मंडळ सामाजिक उपक्रम राबविले जातात. तसेच त्यासाठी त्या मंडळांचे कार्यकर्ते सकाळी नोकरी, व्यवसाय करुन रात्री मंडळाची कामे करतात. तर दहा दिवस विविध उपक्रम राबविले जातात. तर सामाजिक सलोखा जपण्याचे काम देखील मंडळाचे कार्यकर्ते करत असतात. म्हणून हा उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आला. साईकला बहुदेशीय संस्थेमार्फत अनेक सामाजिक उपक्रमांचे नाशिक व धुळे आयोजन करण्यात येते.

यावेळी संस्थचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद सोनवणे, सुनीता सोनवणे, दैनिक लक्ष महाराष्ट्रचे मुख्य उपसंपादक पुरुषोत्तम पाटील , भाजयुमो तालुकासचिव विध्यार्थी आघाडी , सदस्य सहकार्य संस्थचे सदस्य रोहित आघाव, साक्षी कोळी यांच्यासह व्यायाम शाळेचे पदाधिकारी, गणेश मंडळ सदस्य उपस्थित होते.

# गणेशोत्सव कार्यक्रमात विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर.सी.पटेल पॉलिटेक्निक मध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा पाच दिवसाचा गणेशोत्सव उत्साहात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाबरोबरच भारतीय संस्कृती, परंपरा यांचे ज्ञान मिळून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व मानवी मूल्यांची जपणूक होऊन त्यांनी आदर्श व्यक्ती बनावे यासाठी असे विविध पारंपारिक व सांस्कृतिक कार्यक्रम महाविद्यालयात गेल्या सात वर्षांपासून आयोजित केले जातात. यावर्षीच्या गणेशोत्सवाची संकल्पना वसुधैव कुटुंबकम, पर्यावरण संरक्षण, ग्लोबल वार्मीग आदिवासी साक्षरता, कौशल्य विकास अशी होती. या प्रत्येक मुद्यावर प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांनी चर्चासत्र, वक्तृत्व स्पर्धा व विविध स्पर्धांचे आयोजन करुन विचार विमर्श केला व समाजात या बाबींवर कसे काम करता येईल याचे नियोजन केले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शेवटच्या दिवशी ढोल ताशांच्या गजरात तरुणाई आनंदाने थिरकली व बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

**घर विकणे आहे**

**चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे**

**: संपर्क :**

**Mo. 81779 29477**





# लालबाग मारुती मंडळातर्फे जागर स्त्री शक्तीचा!

## आरासचा शुभारंभ विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांच्या हस्ते

















धुळे

। नंबर दोनमधील लालबाग मारुती मित्र मंडळाने लालबागच्या राजांची प्रतिकृती साकारली आहे. मंडळातर्फे जागर स्त्री शक्तीचा' हा सजीव देखावा उभारण्यात आला आहे. यंदाचे वर्ष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष असून, ते साजरे केले जात आहे. शिवरायांनी महिलांचा सन्मान ही शिकवण दिलेली असल्याने हा विषय घेण्यात आलेला आहे. तर 'लव्ह जिहाद' हाही विषय हाताळण्यात आलेला आहे. मोदी सरकारने 'नारी शक्ती वंदन विधेयक, ३३ टक्के आरक्षण मंजूर केले. त्याचाही आनंदोत्सव येथे साजरा करण्यात आला. आरासचा शुभारंभ विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांच्या हस्ते करण्यात आला. मंडळाच्यावतीने जागर स्त्री शक्तीचा या सजीव देखाव्याची निर्मिती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे यंदाचे राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष आहे. या पार्श्वभूमीवर मंडळाने छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली शिकवण 'महिलांचा सन्मान' हा प्रमुख विषय घेतला आहे.

संकलन : दिपक वाघ

# सोनगीर गावातील गणपती बाप्पांचे दर्शन


## सार्वजनिक गणेश मंडळांनी केली आकर्षक गणपती मूर्तीची स्थापना



श्री.शिवशक्ती गणेश मित्र मंडळ सोनगीर




श्री.कृपा गणेश मित्र मंडळ




पवनपुत्र गणेश मित्र मंडळ



हेंरब गणेश मित्र मंडळ



विघ्नहर्ता गणेश मित्र मंडळ



गुरु गोविंद मित्र मंडळ



संत सावता मित्र मंडळ



युवा सांस्कृतिक मित्र मंडल

संकलन : रोशन जैन सोनगीर